येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथील रुग्ण बंद्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या औषध देयकास शासनाची मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-१०१७/प्र.क्र. १३९ /तुरुंग-२

२ रा मजला (मुख्य इमारत),मंत्रालय,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०००३२.

दिनांक: १२ जानेवारी, २०१८

वाचा :

१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक इ.प्र. / औषध देयके/ ये.म.का./२०१७/९३२७/ कक्ष-६, दिनांक १८.१०.२०१७.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३० (भाग-२)/२०१३/ विनियम, दिनांक १७ एप्रिल,२०१५

शासन निर्णय

अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांनी हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, दंतरोग, त्वचारोग, कर्करोग इ. आजारांवरील औषधे बंदी रुग्णांकरिता तातडीची गरज म्हणून स्थानिक बाजारपेठेतून तुलनात्मकरित्या दरपत्रके मागवून कमीत कमी दर असलेल्या राधा मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, पुणे यांचेकडुन आवश्यकतेनुसार २४.०२.२०१५ ते ३१.३.२०१५ या कालावधीत रक्कम रु. ३३१८९/- (अक्षरी रुपये तेहतीस हजार एकशे एकोणनव्वद फक्त) ची खरेदी करण्यात आली आहेत. सदरची देयके ही १ वर्षापेक्षा जास्त जुनी असल्यामुळे सदरची देयके अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२ राधा मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, पुणे यांना वरील रु. ३३१८९/- (अक्षरी रुपये तेहतीस हजार एकशे एकोणनव्वद फक्त) अदा करण्यास संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयातील अटीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे. मात्र राधा मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, पुणे यांचेकडुन खरेदी केलेल्या औषधांचे देयक या पूर्वी अदा केलेले नाही याची खातरजमा करुन तसे प्रमाणपत्र अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांनी सादर करावे.

३. सदरचे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३० (भाग-२)/२०१३/ विनियम दिनांक १७ एप्रिल,२०१५ व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उपविभाग १ मधील अनुक्रमांक ६ नियम ४० मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

४. या प्रकरणी होणारा खर्च मागणी क्र.बी-५, मुख्य लेखाशिर्ष, २०५६- तुरुंग (००) १०१ मध्यवर्ती तुरुंग (२०५६ ००३५) ५० इतर खर्च दत्तमत या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११२११२६१९२८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jaysing L.Pawara

Digitally signed by Jaysing L.Pawara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f11b49d608f53d77adcefe8115025d93bfe9dbee3f61b1c150d64818cb09f90c, cn=Jaysing L.Pawara
Date: 2018.01.12 11:32:26 +05'30'

(ज.ल.पावरा)
सह सचिव, गृह विभाग

प्रत,

१. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. कारागृह उपमहानिरीक्षक, (पश्चिम विभाग)पुणे,
४. अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे,
५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
६. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
८. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
९. कक्ष अधिकारी (व्यय-८/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१०.मे. राधा मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, १९५,नाना पेठ,पुणे-४११००२.
११. निवड नस्ती (तुरुंग-२).